**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १२**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :- ०७/०१/२०११

प्रति,

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. १२ बुधवार दि.१२/०१/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- १२/०१/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ८२ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ८३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे इच्छुक भुलतज्ञांची दिनांक ६/०१/२०११ ते दि. ५/०१/२०१४ अखेर तीन वर्षाकरिता प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/- याप्रमाणे पॅनलशिपवर नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८४ | अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्याकरिता श्री.सुरेश विलास घोलप यांची वैद्यकीय अधिकारी यापदी दि.१४/१२/२०१०पासून सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रू.१०,०००/-फक्तचे मानधनावर कंत्राटी करारानुसार नेमणूक करणेस अखेर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०६(३)नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल२००९ ते मार्च २०१०अखेर महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१मधील नियमक्र.५९(१)नमुना क्रमांक २७प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे मंजुरीस्तव. |
| ८६ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३)अन्वये अहमदनगर महानगर पालिकेचे एप्रिल २००९ ते मार्च२०१० अखेरचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे तयार केलेले मत्ता, दायित्व व वार्षिक लेख्यांचा सारांश मंजुरीस्तव. |

...२

| | |
|---|---|
| ८७ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तेपढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार भरावयाच्या वैद्यकीय अधिकारी या पदास चांगला प्रतिसाद मिळणेसाठी एकत्रीत मानधन एम.बी.बी.एस. पदवी धारकास रूपये १०,०००/- ऐवजी रूपये १५,०००/- व एम.डी. पॅथॉलॉजिस्ट पदवीधारकास रूपये १५,०००/- ऐवजी रूपये २०,०००/- याप्रमाणे वाढीव मानधन देण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८८ | मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८० दि.१०/१२/२०१० अन्वये मंजूरी दिल्यानुसार मा.केंद्र शासीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामीचे मंजूर निविदाधारक "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट लि. जे.व्ही." यांचे मागणी नुसार त्यांचे नांवा ऐवजी "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट जे.व्ही." याप्रमाणे बदल करणेस मंजूरी मिळणे प्रकरणी कंपनी कायदयातील वरिष्ठ विधीतज्ञ ॲड.श्री.एस.बी. पल्लोड यांचे मागविण्यांत आलेले मत व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ८९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कचरा संकलन व वाहतुक करणे करिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह डंपर/ मजूर भाडे तत्वावर लावणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्रमांक ८२ मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ८३ ते ८९ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिति सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक-८२ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक- ८२ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले. सबब कार्यवृत्त मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. **व** मा.सौ. ढवण शा.दि. :- मागील सभा दिनांक १०/१२/२०१० रोजीचे सभेमध्ये तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट लि. जे.व्ही. यांचे नांवात बदल करणे विषयीचा प्रस्ताव तहकुब ठेवला होता.

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- मागील सभेत विषय क्र.८० तहकुब ठेवणेबाबत निर्णय झालेला नव्हता. सभेमध्ये झालेले चर्चेनुसार कंपनी कायदयाचे वरिष्ठ सल्लागार श्री. एस.बी. पल्लोड यांचा अभिप्राय घेवुन प्रस्ताव येत्या सभेमध्ये सदर करावा असा ठराव मंजुर झालेला आहे. त्याप्रमाणे आजच्या सभेमध्ये सदरचा प्रस्ताव क्र.८८ हा निर्णयार्थ घेण्यात आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- सदरचा नांव बदलणे बाबत प्रस्ताव निर्णयासाठी आजचे सभेमध्ये घेतलेला आहे. तेव्हा मा. सदस्यांनी सदर विषय चर्चेस आले नंतर त्या प्रकरणी चर्चा करावी मागील सभेमध्ये मंजूर केलेला ठराव क्रमांक ८० सभेमध्ये वाचून दाखवावा.

याप्रमाणे मागील सभा दिनांक १०/१२/२०१० ठराव क्रमांक ८० हा सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- शहर बस वाहतुक सेवेचे अभिकर्ता प्रसन्ना ट्रॅव्हल्स यांनी माझेकडेस पत्र दिलेले असुन त्यांनी त्यांचे नावात "प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन प्रा.लि." या प्रमाणे दुरूस्ती करण्यांस विनंती केलेली आहे ते पत्र सभेमध्ये वाचून दाखवावे.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- शहर बस वाहतुक सेवेचे अभिकर्ता प्रसन्ना बस लिंक्स् प्रा.लि. यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचे नाव "प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन प्रा.लि." याप्रमाणे नांव दुरूस्त करण्यांस हरकत नाही.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- अभिकर्ता संस्था प्रसन्ना ट्रॅव्हल्स यांचे मागणी प्रमाणे त्यांचे नाव "प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन प्रा.लि." असे करण्यांस मंजूरी देण्यात यावी. त्याप्रमाणे इतिवृत्तामध्ये दुरूस्ती करून मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- दुरूस्तीसह मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीत शहर बस वाहतुक सुरू करणे कामीचे अभिकर्ता संस्था "प्रसन्ना बस लिंक्स् प्रा.लि." यांचे नाव "प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन प्रा.लि." असे दुरूस्त करण्यांस व व दुरूस्त नावाप्रमाणे त्यांचेशी पत्रव्यवहार, करारनामा व कार्यारंभ आदेश देणेस मान्यत देण्यांत येत आहे.याप्रमाणे ठराव क्र.७५ दिनांक १०/१२/२०१०चे ठरावामध्ये याप्रमाणेचे दुरूस्तासह मागील सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

<u>**ठराव :-**</u> मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देणे विषयी सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार ठराव क्रमांक ७५ दिनांक १०/१२/२०१० बाबत पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शहर बस वाहतुकीचे मंजूर अभिकर्ता संस्था यांचे "प्रसन्ना बस लिंक्स् प्रा.लि." या नावांऐवजी "प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन प्रा.लि." या प्रमाणे नांव दुरूस्त करण्यांस व दुरूस्त नावाने त्यांचेशी पत्रव्यववहार, करारनामा व कार्यारंभ आदेश देणेस मान्यता देण्यात येत आहे. याप्रमाणे दुरूस्तीसह मागील सभा क्रमांक ११ शुक्रवार दिनांक १०/१२/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक-८३ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक -८३ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे इच्छुक भुलतज्ञांची दिनांक ६/०१/२०११ ते दि. ५/०१/२०१४ अखेर तीन वर्षाकरिता प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/-व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/-याप्रमाणे पॅनलशिपवर नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा.कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह दि.२/१२/१०
जा.नं. ६५३ दि.७/१२/२०१०

सादर,

विनंती रिपोर्ट की, कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करीता वैद्यकीय अधिकारी बधिरीकरण तज्ञांची आवश्यकता असते. भुल तज्ञांचे पद आस्थापना सुचीवर नाही. त्याकरीता मा.स्थायी समिती ठराव नं.६१ दि. ३०/३/२०१० अन्वये दि.६/०७/१०ते ५/१/२०११अखेर प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रू.४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- प्रमाणे शहरातील इच्छुक वैद्यकीय अधिकारी बधिरीकरण तज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणुक करण्यात आलेली असुन सदरची मुदत दि. ५/१/२०११ रोजी संपत आहे.

दवाखान्यात दरमहा साधरणत: ५० ते ६० मेजर ऑपरेशन व ३० ते ४० मायनर ऑपरेशन करीता भुलतंज्ञाची आवश्यकता असते. सध्या भुल दिल्याबद्दल महानगरपालिकातर्फे दि.१/४/२००० पासून १) जनरल अॅनेस्थेशिया (ऑपरेशन टयुबेकटोमी व्यतिरिक्त) रू.१००/- २) लोकल अॅनेस्थेशिया रू.३०/- प्रत्येक ऑपरेशन करीता फी म्हणुन वसुल केली जाते.

कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृहामध्ये प्रामुख्याने गरीब व मध्यम वर्गातील रूग्ण औषधोपचार व प्रसुति करीता येतात. त्यामुळे भुलतज्ञा अभावी ऑपरेशन करिता खाजगीरित्या भुलतज्ञांना कॉल केल्यास त्यांची भुल दिल्याबद्दलची फी रूग्णांना परवडणारी नसते. त्यामुळे रूग्णांची व पर्यायाने हॉस्पीटलची गैरसोय होईल.

तरी हॉस्पीटलच्या दृष्टीने इमर्जन्सीच्यावेळी रूग्ण भुलतज्ञा अभावी दाखल करून घेणे धोक्याचे होईल व त्यामुळे हॉस्पीटल मध्ये दाखल होणा-या रूग्णांच्या संख्येवर परिणाम होण्याची दाट शक्यता लक्षात घेता हॉस्पीटल व रूग्णांच्या दृष्टीने भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करणे गरजेचे आहे.

तसेच सदरची नेमणूक ही पॅनलशिपवर असुन भुलतज्ञांना अदा करण्यात येणारी रक्कम ही मानधन नसुन त्यांनी केलेल्या केसस प्रमाणे अदा करण्यात येते. त्यामुळे त्यांची नेमणूक करते वेळी तांत्रिक खंड दिल्यास खंड दिलेल्या कालावधीमधील केसेसची रक्कम अदा करणे अडचणीचे होते.

तरी दि.०६/०१/२०११ ते पासुन ०५/०१/२०१४ अखेर तीन वर्षांकरिता पॅनलशिपवर प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता४००/- (रूपये चारशे फक्त ) व प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- (रूपये दोनशे फक्त) या प्रमाणे सोबतच्या यादीतील अहमदनगर शहरातील इच्छुक भुल तज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यासाठी मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

एम.ओ.एच :- प्रस्तावानुसार मंजूरी देणे योग्य.

अंतर्गत लेखा परिक्षक :- प्रस्तावाप्रमाणे पॅनलशिपवर केसेसप्रमाणे दि.६/१/११ ते ५/१/२०१४ अखेर तीन वर्षाकरिता भुलतज्ञांची नेमणुक करणेस प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस्तव सादर./**अ**

मुख्य लेखा अधिकारी :- **"अ"** नुसार मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस सादर.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत मान्यतेस सादर. ३/१२/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.६/१२/२०१०

---**--

| कै.बा.दे.दवाखान्याकरिता पॅनलशिपवर नेमणूक करणेकामी अहमदनगर शहरातील इच्छुक भुल तज्ञांची यादी | |
|---|---|
| १ | डॉ. सौ. सायंबर |
| २ | डॉ.श्री. सचिन लवांडे |
| ३ | डॉ. श्री. सचिन लांडगे |
| ४ | डॉ.सौ. भारती खनकर |
| ५ | डॉ.श्री. किशोर खराड |
| ६ | डॉ.श्री. मिलींद पोळ |
| ७ | डॉ.श्री. शशांक मोहळे |
| ८ | डॉ.श्री. महादेव रंडाळे |
| ९ | डॉ.श्री. शिरीष कुलकर्णी |
| १० | डॉ.सौ. संगिता कुलकर्णी |
| ११ | डॉ. श्री. सुरेश सुराणा |
| १२ | डॉ. श्री. ललीतराम जोशी |
| १३ | डॉ.श्री. कृष्णा पांडे |
| १४ | डॉ.श्री. निसार |
| १५ | डॉ. श्री. के.टी. कलवानी |
| १६ | डॉ.सौ. फलके |

येणेप्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै.बा.देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यांस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

वैद्यकीय अधिकारी डॉ. टेकवाणी :- आपले महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे ५०० ते ६०० डिलीव्हरी होतात. त्यामधील अंदाजे ४०ते ५०सिझेरियनच्या केसेस होतात तसेच छोटे छोटे ऑपरेशन ही होतात त्याकरीता रूग्णांना भुल देण्यांची आवश्यकता असते.

मा.श्री. पवार बा.रे. व मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- पूर्वी किती मानधन देण्यात येत होते.

वैद्यकीय अधिकारी डॉ. टेकवाणी :- माझेकडेस डॉ.श्री. सुरेश बी. सुराणा यांनी मानधन वाढवून मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तो सभेमध्ये वाचून दाखवितो.

Sub:- Increase of charges of anasthesia for major and minor suregery of BDCDH

Respecd Sir., I am working on honorary Anaesthesiologist at BDCDH since long time There is on increase in charges for long time as prices hiken in all respect. please increase the charges of major operation as Rs.600 /- and Rs.300/- for minor, Please do needfull मानधन वाढवून मिळावे अन्यथा आम्ही आमची सेवा देणार नाही. अशाबाबत भुलतज्ञ डॉक्टरांची मागणी आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- पॅनलशिप म्हणजे काय ?

वैद्यकीय अधिकारी डॉ. टेकवाणी :- आपण आवश्यक वेळी पॅनलशीपवर नेमलेल्या डॉक्टरांना कॉल करतो. तेव्हा ते हॉस्पीटल मध्ये येतात त्यांना आलटून पालटून बोलावले जाते आपली सेवा देणारे इच्छुक भुलतज्ञांची आपण पॅनलशिपवर नेमणूक करतो.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- भुलतज्ञ डॉक्टरांना आपण कायम नेमणूक का देण्यांत येत नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. देशमुख साहेब :-आपले आस्थापना सुचीवर भुलतज्ञांचे पद मंजूर नाही.त्यामुळे महानगरपालिकामध्ये भुलतज्ञ पॅनलशिपवर नेमण्याची प्रथा आहे.

वैद्यकीय अधिकारी डॉ.टेकवाणी :- दोन भुलतज्ञांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- मानधन वाढवून देण्यात यावे अशाबाबत अजेंडयावरील प्रस्तावामध्ये उल्लेख का केला नाही.

वैद्यकीय अधिकारी डॉ. टेकवाणी :- माझेकडेस दिनांक ७/१/२०११ रोजी डॉ. सुराणा यांनी वाढीव मानधन मिळाणेसाठीचा अर्ज दिला आहे.

मा.सभापती साहेब :- मेजर ऑपरेशन करिता रूपये १००/- व मायनर ऑपरेशन करिता रूपये १००/- याप्रमाणे मानधन वाढवून देणेस सभेने मंजूरी द्यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- मेजर ऑपरेशन करिता रूपये १००/- मायनर ऑपरेशन करिता रूपये ५०/- याप्रमाणे मानधनात वाढ करण्यास मंजूरी देण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. मात्र महानगरपालिकेचे आस्थापना सुचीवर भुलतज्ञांचे पदनिर्मितीचा प्रस्ताव देण्यात यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/- ऐवजी रूपये ५००/- व मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/- ऐवजी रूपये २५०/- याप्रमाणे मानधनात वाढ करण्यांस मंजूरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/- ऐवजी रूपये ५००/- व मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/- ऐवजी रूपये २५०/- याप्रमाणे मानधनात वाढ करून भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे इच्छुक भुलतज्ञांची दिनांक ६/०१/२०११ ते दि. ५/०१/२०१४ अखेर तीन वर्षाकरिता प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/- ऐवजी रूपये ५००/- (रू. पाचशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/- ऐवजी रूपये २५०/- (रू. दोनशे पन्नास फक्त) या प्रमाणे मानधनात वाढ करून भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक-८४ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक -८४ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्याकरिता श्री.सुरेश विलास घोलप यांची वैद्यकीय अधिकारी यापदी दि.१४/१२/२०१०पासून सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रू.१०,०००/-फक्तचे मानधनावर कंत्राटी करारानुसार नेमणूक करणेस अखेर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. आस्था. जा.क्र. ८६ दि. १४/१२/२०१०

प्रस्तावना-विषय- फिरत्या दवाखान्या करीता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारा नुसार मानधनावर करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांनी दिनांक १२/१०/१० रोजी अर्ज देवुन "जा.क्र. आस्था. /कंत्राटी करार नेमणुक ७०१ दिनांक ५/६/२०१० अन्वये वैद्यकीय अधिकारी (फिरता दवाखाना) या पदावर कंत्राटी करारा नुसार सहा महिन्याकरीता असा असून सदरचा कालावधी दिनांक ७/१२/२०१० रोजी समाप्त होत आहे. फिरत्या दवाखान्यावर वैद्यकीय अधिकारी म्हणुन पुर्नेनेमणूक व्हावी" असे नमुद करून विनंती केलेली आहे.

सदरच्या अर्जावर मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी बा.दे.दवाखाना व मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी वरीलप्रमाणे पुर्नेनेमणुक होणेस विनंती व शिफारस जा.क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना ५४० दिनांक २६/१०/१० च्या प्रस्तावान्वये केलेली आहे.

तरी मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचे कडील प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्या करिता डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करार नेमणुक २९९०दिनांक १३/१२/२०१०अन्वये तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी कारार नुसार दरमहा रूपये१०,०००/-(अक्षरी रूपये दहा हजार मात्र) या मानधनावर दिनांक १४/१२/२०१०पासून सहा महिन्याकरीता केलेल्या करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- फिरत्या दवाखान्याकरिता डॉ.श्री. सुरेश घोलप यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक करणेस अखेर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- फिरत्या दवाखान्याकरिता ड्रायव्हर नाही म्हणून तो बंद ठेवलेला आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री. बोरगे ए.एस. :- डॉक्टर घोलप हे ओपीडी मध्ये डॉक्टरांना मदत करतात. फिरत्या दवाखान्याला ड्रायव्हर मिळत नाही. त्यामुळे फिरता दवाखाना बंद आहे.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- आरोग्य विभागाचे आखत्यारित ड्रायव्हर लावले जातात. भाडे तत्वावर ड्रायव्हरची नेमणूक त्यांनी करावी. गैरसोय होणार नाही हे त्यांनी पहावे.

मा.सभापती साहेब :- ड्रायव्हर नसलेने फिरता दवाखाना बंद ठेवला आहे. मग ड्रायव्हर मिळणेसाठी प्रस्ताव सादर का केला नाही.

वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री. टेकवाणी पी.आर. :- प्रस्ताव आस्थापना विभागाकडेस दिलेला आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- फिरत्या दवाखान्यास ड्रायव्हर केव्हा पासून नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. देशमुख साहेब :- फिरता दवाखाना बंद नको. आरोग्य विभागाकडील घनकचरा व्यवस्थापनासाठी एक ड्रायव्हर वाढवून घ्यावा. गैरसोय होवु देवु नये.

मा.सभापती साहेब :- फिरत्या दवाखान्यासाठी कंत्राटी पध्दतीने ड्रायव्हर नेमणेसाठी जाहिरात देण्यात यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्याकरिता श्री.सुरेश विलास घोलप यांची वैद्यकीय अधिकारी यापदी दि.१४/१२/२०१०पासून सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रू.१०,०००/- (रूपये दहा हजार फक्त ) चे मानधनावर कंत्राटी करारानुसार नेमणूक करणेस अखेर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक-८५ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक -८५ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषयः-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०६ (३) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल२००९ ते मार्च २०१०अखेर महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियमक्र.५९(१)नमुना क्रमांक २७प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर जा.क्र.अर्थ/अंदाजपत्रक/५३१/१० दि.१८/१२/२०१०

सादर,

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.५९(१) नमुना क्र.२७ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००९ ते मार्च २०१० अखेर बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये "नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे" असे नमुद करण्यात आले आहे.

तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेवुन मा. स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

येणे प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे. दि.१७/८/१०

**सोबत :-** सन २००९-२०१० चा जमा-खर्चाचा वार्षिक लेखा

मुख्य लेखा परिक्षक :- सन २००९-१० चे वार्षिक लेखा सारांश स्थायी समिती समोर चर्चेस ठेवणेत यावा. दि. १३/१२/२०१०

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- **"अ "** प्रस्तावीत मान्यतेस सादर. दि.१३/१२/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. १८/१२/२०१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे सन २००९- २०१० चे बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे मंजूर करणे आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

अकौंट विभाग श्री. लोंढे :- सन २००९-२०१० मध्ये झालेली जमा व केलेला खर्च यांचे तक्ते मंजूरीस्तव सादर केलेले आहेत.

मा.उपायुक्त (सा.) श्री. देशमुख साहेब :- नियमाप्रमाणे महानगरपालिकेचे वार्षिक लेख्यांचा सारांश व मत्ता दायित्वाचे तक्ते मंजूरीस्त सादर करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यास मंजूरी मिळावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- प्रस्ताव क्रमांक ८५ व ८६ चे ऑफिस रिपोर्टास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्टास मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्रमांक ८५ व ८६ चे ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०६ (३) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल२००९ ते मार्च २०१०अखेर महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियमक्र.५९(१)नमुना क्रमांक२७प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेख्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा. महानगरपालिका सभे कडेस सादर.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक-८६ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक -८६ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषयः-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३)अन्वये अहमदनगर महानगर पालिकेचे एप्रिल २००९ ते मार्च२०१० अखेरचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे तयार केलेले मत्ता, दायित्व व वार्षिक लेख्यांचा सारांश मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर जा.क्र.अर्थ/अंदाजपत्रक/५३१/१० दि.१८/१२/२०१०

सादर,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये "नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा. स्थायी समितीस सादर केला पाहिजे" असे नमुद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००९ ते मार्च २०१० अखेर वार्षिक लेख्याचा सारांश तयार करण्यात आला आहे. यात सुरवातीची शिल्लक रू.१४ कोटी ८४ लाख ८६ हजार ६३१ असून आर्थिक वर्षात रू.१ अब्ज १५ कोटी ६० लाख ७२ हजार ६३५ इतके जमा झाले आहेत. सुरवातीची शिल्लक धरून एकुण जमा रू. १ अब्ज ३० कोटी ४५ लाख ५९ हजार २६६ असून रू. १ अब्ज १४ कोटी ५७ लाख ८१ हजार ८९५ खर्च वजा जाता रू.१५ कोटी ८७ लाख ७७ हजार ३७१ इतकी अखेरची शिल्लक राहिली.

तसेच नियम नं.६१ नमुना नं. २९ प्रमाणे ३१ मार्च २०१० अखेरचे मत्ता व दायित्व तयार करण्यात आलेले आहे. यात मत्ता हे रू. १ अब्ज ७६ कोटी ३० लाख ७१ हजार २०५ असुन दायित्व २ अब्ज ५७ कोटी ९१ लाख ८८ हजार ४१९ आहे. दायित्व हे मत्तेपेक्षा ८१ कोटी ६१ लाख १७ हजार २१४ ने अधिक आहे.

तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेवुन मा. स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

येणेप्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

**सोबत :-** सन २००९-२०१० चा

१] वार्षिक लेख्याचा सारांश

२] मत्ता- दायित्व तक्ता.

मुख्य लेखापरिक्षक :- सन ०९-१० चा वार्षिक लेखा / मत्ता दायित्वे स्थायी समिती समोर चर्चेस ठेवणेत यावा. दि. १३/१२/२०१०

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- "अ" प्रस्तावीत मान्यतेस सादर. दि.१३/१२/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१८/१२/२०१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३)अन्वये अहमदनगर महानगर पालिकेचे एप्रिल २००९ ते मार्च२०१० अखेरचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६० नमुना क्र.२८ प्रमाणे तयार केलेले मत्ता, दायित्व व वार्षिक लेख्यांचा सारांशास मंजूरी देण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभेकडेस सादर.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक-८७ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक -८७ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार भरावयाच्या वैद्यकीय अधिकारी या पदास चांगला प्रतिसाद मिळणेसाठी एकत्रित मानधन एम.बी.बी.एस. पदवी धारकास रूपये १०,०००/-ऐवजी रूपये रूपये १५,०००/- व एम.डी. पॅथॉलॉजिस्ट पदवी धारकास रूपये १५,०००/- ऐवजी रूपये २०,०००/- याप्रमाणे वाढीव मानधन देण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थानपा जा.क्र. ४५२५ दि. २९/१२/२०१०

प्रस्तावना-विषय- रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदाचे मानधन वाढविणे बाबत.

सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार भरावयाच्या वैद्यकीय अधिकारी या पदासाठी वर्तमान पत्रामध्ये वेळोवेळी जाहिरात देण्यात आलेली आहे. परंतु उमेदवारांचा अल्प प्रतिसाद मिळालेला आहे.

सध्या सदर वैद्यकीय अधिकारी पदास एकत्रित मानधन एस.बी.बी. एस.साठी रू. रू.१०,०००/- व एम.डी. पॅथॉलॉजिस्ट पदासाठी रूपये १५,०००/- असे आहे. तथापी सदरचे मानधन रूपये १०,०००/- ऐवजी रू.१५,०००/- (अक्षरी रू. पंधरा हजार ) व रू.१५,०००/- ऐवजी रू.२०,०००/- (अक्षरी रू. वीस हजार ) करणे आवश्यक आहे. त्या बाबत. मा.स्थायी समितीने निर्णय घेणे आवश्यक आहे. तथापी वर्तमान पत्रामधील जाहिरातीस उमेदवारांचा चांगला प्रतिसाद मिळणेसाठी जाहिरातीमध्ये मानधन वाढ प्रस्तावीत अशी टिप नमुद आहे. त्यास मान्यता मिळावी. व उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर पदाकरीता मानधनवाढी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयासाठी ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे. दि.२४/१२/२०१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी करिता कंत्राटी करारानुसार नेमावयाच्या वैद्यकीय अधिकारी यांना वाढीव मानधन देण्यास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती सांगावी.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री. बोरगे :- रक्तपेढी करिता अनुभवी तज्ञ रक्त संक्रमण अधिकारी असणे आवश्यक आहे. रक्तपेढी साठी एम.डी. पॅथॉलॉजीस्ट व एम.बी.बी.एम. पदवी धारक व एक वर्षाचा अनुभव असणारे तज्ञांस रूपये २०,०००/- याप्रमाणे मानधन देण्यात यावे. अनुभव व शिक्षण नुसार वाढीव मानधन देण्यात यावे. अनुभवी उमदेवारास शिकविण्यची आवश्यक्ता नसते. तो तात्काळ काम सुरू करू शकतो. एम.डी.पॅथॉलॉजिस्ट रक्तपेढीसाठी असावा असे नाही. शिक्षण व अनुभव आवश्यक आहे त्यासाठी काही नियमावली ठरवावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. देशमुख साहेब :- त्याप्रमाणे सविस्तर प्रस्ताव मा.सभेपुढे ठेवण्यात यावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- हा प्रस्ताव तहकुब ठेवावा. वाढीव मानधन देणेबाबत सविस्तर प्रस्ताव सभेपुढे मंजूरीसाठी ठेवण्यात यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्ताव तहकुब ठेवावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते प्रस्ताव तहकुब ठेवावा. वाढीव मानधन देणेबाबत प्रशासनाने अनुभव, शिक्षण व ब्लॅडबँके बाबत कायद्यातील तरतुदी याबाबत सविस्तर प्रस्ताव सभेपुढे मंजूरीस्तव सादर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरीता कंत्राटी करारानुसार भरावयाच्या वैद्यकीय अधिकारी या पदास चांगला प्रतिसाद मिळणेसाठी एकत्रित मानधन एम.बी.बी.एस. पदवी धारकास रूपये १०,०००/-ऐवजी रूपये रूपये १५,०००/- व एम.डी. पॅथॉलॉजिस्ट पदवी धारकास रूपये १५,०००/- ऐवजी रूपये २०,०००/- याप्रमाणे वाढीव मानधन देणे बाबत प्रस्ताव तहकुब ठेवण्यांत यावा.

प्रशासनाने अनुभव, शिक्षण व ब्लॅडबॅके बाबत कायद्यातील तरतुदी याबाबत सविस्तर प्रस्ताव पुढिल सभेमध्ये निर्णयासाठी सादर करावा.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक-८८ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक -८८ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८० दि.१०/१२/२०१० अन्वये मंजूरी दिल्यानुसार मा.केंद्र शासीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामीचे मंजूर निविदाधारक "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट लि. जे.व्ही." यांचे मागणी नुसार त्यांचे नांवा ऐवजी "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट जे.व्ही." याप्रमाणे बदल करणेस मंजूरी मिळणे प्रकरणी कंपनी कायदयातील वरिष्ठ विधीतज्ञ ॲड.श्री.एस.बी. पल्लोड यांचे मागविण्यांत आलेले मत व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रेषक-शहर पाणीपुरवठा विभाग, प्रति-मा.नगरसचिव दि.३१/१२/२०१०

**प्रस्तावना-** विषय- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२
मे. तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट लि. JV मुंबई यांचे नावातील बदला बाबत.
संदर्भ :- १) मा. स्थायी समिती सभा क्र.११ ठराव क्र.८० दि.१०/१२/२०१०
२) मा.ॲड. श्री. शरद पल्लोड यांचे दि.२५/१२/२०१० रोजीचे पत्र.

**टिप्पणी:**

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा.स्थायी समिती सभा क्र.११ ठराव क्र.८० दि.१०/१२/२०१० च्या पारीत ठरावानुसार इकडील जा.क्र. पा.पु. १३०५ दि.१८/१२/२०१० अन्वये कंपनी कायदयातील वरिष्ठ विधीतज्ञ ॲड. श्री. शरद पल्लोड यांचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने ॲड. श्री. शरद पल्लोड यांचे संदर्भिय पत्र क्र.२ इकडेस प्राप्त झाले आहे.

ॲड. श्री. शरद पल्लोड यांचे प्राप्त झालेले पत्र मा.स्थायी समितीपुढे चर्चेसाठी ठेवणे बाबत पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला.

त्या अनुषंगाने मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी " सदरच्या नस्तीचे व विधी सल्लागार यांचे दि.२५/१२/२०१० चे पत्र पाहता रजिस्ट्रेशन ऑफ फर्म मुंबई यांना याविषयी (रजिस्ट्रेशन) व त्यावर संबंधीत कार्यालयाचे प्राप्त झालेले उत्तर उपलब्ध नाही. तथापी प्रस्तुत केल्याप्रमाणे ॲड. शरद पल्लोड विधी सल्लागार यांचे प्राप्त झालेले पत्र चर्चेसाठी मा.स्थायी समिती पुढे चर्चेसाठी ठेवण्यात यावे. " असा अभिप्राय दिला आहे.

त्यावर मा. मुख्यलेखाधिकारी यांनी "मा. स्थायी समिती ठराव क्र.८० दि.१०/१२/२०१० नुसार प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव संदिग्ध स्वरूपाचा असल्याबद्दल उल्लेखीत आहे. विधी सल्लागार ॲड. श्री. शरद पल्लोड यांचे दि.२५/१२/२०१० रोजीचे पत्र पाहता, रजिस्ट्रार ऑफ फर्म, मुंबई यांना रजिस्ट्रेशन विषयी पाठविलेले पत्र व त्यावर संबंधीत कार्यालयाचे प्राप्त झालेले पत्र (उत्तर) नस्ती सोबत उपलब्ध नाही.

सारासार विचार करता एखाद्या संस्थेची नोंदणी (नावाची) ज्या कार्यालयाकडे घेते त्याच कार्यालयाकडे सदर संस्थेच्या नावात बदल करण्याचा प्रस्ताव सादर करावयास पाहिजे.

तथापी सदरील प्रस्ताव "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे चर्चेसाठी स्थायी समिती पुढे चर्चेसाठी ठेवण्यात यावा." असा अभिप्राय दिला आहे.

त्यावर मा. उपायुक्त (सा.) यांनी "मा.स्थायी समिती ठराव क्र.८० दि.१०/१२/२०१० अन्वये मंजूरी दिल्याप्रमाणे ॲड. एस.बी. पल्लोड यांचे मत मागविण्यात आले असून सदरचे मत मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य होईल. सबब आदेशार्थ" असा अभिप्राय दिला आहे.

त्यावर मा. आयुक्त यांनी मा. उपायुक्त यांचे वरीलप्रमाणे अभिप्रायास संमती दर्शविली असल्याने, सदर पत्र / अभिप्राय मा.स्थायी समिती कडे योग्य त्या निर्णयासाठी सादर करणेत येत आहे.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.३१/१२/२०१०

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी मंजूर निविदा धारक यांचे नावात बदल करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूर निविदा धारक यांचे नावात बदल करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- कंपनी कायदयातील तज्ञांनी दिलेला अभिप्राय इंग्रजीमध्ये आहे त्याचे मराठी भाषातर करून आम्हास सांगाण्यात यावे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. देशमुख साहेब :- ॲड. श्री. पल्लोड यांचे पत्र वाचून दाखविण्यात यावे व त्याचे मराठी भाषांतर करून सांगाण्यात यावे.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- ॲड. श्री. शरद पल्लोड यांनी दिलेले पत्रामधील मुद्दा क्रमांक ७ वाचून दाखवितो.It is clear from provisions of partnership Act that, said Act, there is on prohibition in the said Act for change in the name. On the contrary,section 58 of the Act provides that while making application for registration of the firm, name of the firm and other information as stated in that provision should be furnished to the Registrar of Firms and section 60 provides that when an alteration is made in the name of the firm, a statement may be sent to the Registrar accompanied by prescribed fee specifying alteration and signed and verified in the manner U/s 59 Thus from this provision, it is clear that partnership firm can make alteration or change in the name of the firm and there is no legal bar for the same. Hence, I am of the view that as name of the firm has been changed, same can be accepted and further correspondence can be made in the new name. याचा सारांश असा की, हा जो नांवात बदल करणे बाबतचा प्रस्ताव आहे त्याप्रमाणे ज्याचे कडेस नावांची नोंद झालेली आहे. त्यांनाच नावात बदल करता येईल तसेच बदललेल्या नावाप्रमाणे त्यांचेशी पत्रव्यवहार करता येईल याप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- महानगरपालिकेचे हायकोर्टातील वकीलांनी अभिप्राय दिलेला नाही. मागील सभेत महानगरपालिकेचे वकीलांनी नावांत बदल करता येणार नाही असा अभिप्राय दिलेला आहे नावांत बदल करण्यांस आमचा विरोध नोंदवावी आम्ही त्याबाबत मा.सभापती साहेब यांचेकडेस पत्र दिलेले ओ. त्याची नोंद सभेचे कामकाजात घेण्यात यावी. नावांत बदल करू नये वकीलांनी नावात बदल करू नये. असा अभिप्राय दिला होता.

मा.सभापती साहेब :- मा.सौ. ढोणे मालनताई सुरेश यांनी दिलेल्या पत्राची प्रोसिडींगमध्ये नोंद घेण्यात यावी.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- मा.सभापती साहेब, महोदय, दिनांक ११/१२/२०१० रोजी झालेल्या स्थायी समिती मधील विषय क्रमांक ८० बाबत सौ. ढोणे नगरसेविका यांनी त्यांचेकडील पत्र क्र. प्र.क्र. ३४/५६/२०१० दिनांक १०/१२/२०१० चे वाचन करून सदर विषयास आम्ही खालील सह्या करणार सौ. शारदा दिगंबर ढवण व सौ. शिला अनिल शिंदे व सौ. ढोणे या स्थायी समिती सदस्यांनी विरोध दर्शवून तशी इतिवृत्तामध्ये नोंद घेण्याबाबत मिटींग मध्ये चर्चा झाली. व सदरचा विषय तहकूब ठेवणेबाबत खुलासा केला मात्र दिनांक ७/१/२०११ रोजी काढणेत आलेल्या अजेंडयामध्ये कंपनी कायद्यातील विधिज्ञ श्री. शरद बी. पल्लोड यांचा अभिप्राय घेणेबद्दल नमूद केले आहे. वास्तविक आमच्यासमोर अशी कोणतीही चर्चा झालेली नाही. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. स्थायी समिती सदस्यांची दिशाभूल करणेत येते असे आमचे मत आहे. याचाच अर्थ आपण आपल्या मताप्रमाणेच इतिवृत्तांत नोंद करण्यात येते. दूसरे महत्वाचे म्हणजे उच्च न्यायालयातील महापालिकेने नेमणूक केलेल्या सल्लागारांनी सुध्दा वरील नावांत बदल करणेस विरोध दर्शविलेला आहे. तसेच पाणी पुरवठा विभाग प्रमुख, अ.नगर महानगरपालिका यांनीही त्यांचे टिपणीत "सारासार विचार करता एखाद्या संस्थेची नोंदणी (नावाची) ज्या कार्यालयाकडे करणेत येते त्याच कार्यालयाकडून सदर संस्थेच्या नावांत बदल करण्याचा प्रस्ताव सादर करावयास पाहिजे" प्रशासनाचे व कायदेशीर सल्लागाराचे अभिप्राय डावलून सदर विषयाचा अनुकलता दर्शविणे बाबत कोणत्यातरी सदस्याचा विचार दिसतो.

तरी आमचा यास ठाम विरोध आहे. सदरची बाब मा. उच्च न्यायालय औरंगाबाद यांचे कडेस मे. तापी प्रिस्टेज प्रॉडक्टस् लि. जे.व्ही. याच नावाने दाखल होवुन मे. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. सदरचा विषय घेवुन मे. उच्च न्यायालयाचा अवमान होईल त्यास जबाबदार कोण राहणार आहे ? तसेच ज्या स्थायी समिती सदस्यांचा सदर विषयांस पाठिंबा द्यावयाचा असल्यास पुढील होणा-या सर्व कायदेशीर बाबीला तेच सदस्य जबाबदार राहतील. महापालिका अगर शहरातील गरीब नागरिकांचा कर रूपाने येणा-या पैशाचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आमचे मत असून त्याची सर्व नोंद इतिवृत्तांत घ्यावी.

तसेच सदर स्थायी समितीमध्ये होणा-या विषयावर काय चर्चा झाली व कोणता ठराव घेण्यात आलेला आहे त्याची त्वरीत नोंद घेवुन त्याची चर्चा व्हावी. या पुढे मागील आमचा अपरोक्ष घेण्यात आलेल्या इतिवृत्ताला आमचा विरोध आहे.

मा.उपायुक्त (सा)श्री.देशमुख साहेब :- कंपनी कायदयातील तज्ञ असलेल्या अॅड.श्री. पल्लोड एस.बी. यांचा अभिप्राय घेण्यात येवुन प्रस्ताव येत्या सभेमध्ये सादर करण्यांत यावा. याप्रमाणे मागील सभेत झालेल्या चर्चेनुसार अॅड श्री. पल्लोड यांचे मत मागविण्यांत आलेले असुन त्याप्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- आम्हा तीनही विरोधी सदस्यांचा नावात बदल करण्यास विरोध नोंदविण्यात यावा.

मा.श्री.पवार बा.रे. :- सदर अभिकर्ता संस्थेचे संचालक बदलले जातील का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- नाही, संचालक तेच असणार आहेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- वरिष्ठ विधीतज्ञ अॅड श्री. पल्लोड एस.बी. यांनी दिलेल्या मताप्रमाणे अभिकर्ता यांचे नावात बदल करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- नावांत बदल करण्यांस मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार वरिष्ठ विधीतज्ञ अॅड. श्री. पल्लोड एस.बी. यांनी दिलेल्या संस्थेची नोंदणी (नावाची) ज्या कार्यालयाकडे घेण्यात येते त्या कार्यालयाकडे सदर संस्थेच्या नावात बदल करणेसाठी प्रस्ताव सादर करावयास पाहिजे याप्रमाणेचे अभिप्रायानुसार मा.केंद्र शासीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामीचे मंजूर निविदाधारक "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट लि. जे.व्ही." यांचे मागणी नुसार त्यांचे नांवा ऐवजी "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट जे.व्ही." याप्रमाणे बदल करण्यांस बहुमताने मंजूरी देण्यांत यावी. ठराव बहुमताने मंजूर करावा.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८० दि.१०/१२/२०१० अन्वये मंजूरी दिल्यानुसार वरिष्ठ विधीतज्ञ अॅड.श्री.पल्लोड एस.बी. यांनी दिलेल्या संस्थेची नोंदणी (नावाची) ज्या कार्यालयाकडे घेण्यात येते त्या कार्यालयाकडे सदर संस्थेच्या नावात बदल करणेसाठी प्रस्ताव सादर करावयास पाहिजे याप्रमाणे अभिप्रायानुसार मा.केंद्र शासीत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामीचे मंजूर निविदाधारक "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट लि. जे.व्ही." यांचे मागणी नुसार त्यांचे नांवा ऐवजी "तापी प्रिस्ट्रेस प्रॉडक्ट जे.व्ही." याप्रमाणे बदल करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सदरचे ठरावास मा.स्थायी समिती सदस्य मा.सौ. ढोणे मालन सुरेश, मा.सौ. ढवण शारदा दिंगबर, मा.सौ. शिंदे शिला अनिल यांचा विरोध

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ . सही/-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक-८९ बुधवार दिनांक १२/०१/२०११

ठराव क्रमांक -८९ बुधवार दिनांक १२/०१/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कचरा संकलन व वाहतुक करणे करिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह डंपर/ मजूर भाडे तत्वावर लावणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन
जा.क्र. ३५४ दि.४/०१/२०११
प्रति, नगरसचिव , अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर

विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कचरा संकलन व वाहतुक करणे करीता ट्रॅक्टर ट्रॉलीसह / डंपर मजुर भाडे तत्वावर लावणेबाबत प्राप्त निविदा दरास स्थायी समितीची मंजुरी मिळण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, घन कचरा व्यवस्थापन विभागासाठी ट्रॅक्टर ट्रॉलीसह / डंपर व मजुर भाडे तत्वावर लावणेबाबत. एक वर्षाकरीता देय दराची सिलबंद फेर निविदा दि.८/१२/१० ते दि.१६/१२/१० दरम्यान मागविण्यांत आली होती.

वरील निविदा दि.२३/१२/२०१० रोजी उपायुक्त (कर) यांचे दालनात निविदा (तांत्रिक लिफाफा क्र.१) उघडण्यात आली. तसेच दरपत्रके दि.३१/१२/१० रोजी उघडण्यात आले. त्या वेळेस स्वामी सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स या संस्थेचे दर तुलनात्मक दृष्टया कमी असल्याचे दिसुन आले. सदर बाबत खालील प्रमाणे दर प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | कामाचा तपशील | निविदाकाराने निविदे मध्ये नमूद केलेले दर | |
|---|---|---|---|
| १ | विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कचरा संकलन व वाहतुक करणेकरीता ट्रॅक्टर ट्रॉलीसह / डंपर (टिपर) मजुर भाडे तत्वावर लावणे बाबत. | प्रति ट्रॅक्टर | १५९९/- दिन |
| | | प्रति डंपर / टिपर | ३३००/- दिन |
| | | प्रति मजूर | ३१०/- दिन |

वरील प्रमाणे प्राप्त दर पत्रकानुसार स्वामी सप्लायर्स ॲन्ड अर्थ मुव्हर्स या संस्थेचे दर तुलनात्मक दृष्टया कमी दराचे असल्याने सदर संस्थेस दि.४/१/२०११ रोजी दु.२.०० वा. मा. उपायुक्त साहेब यांच्या समक्ष मुख्य लेखा अधिकारी व घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांच्या उपस्थिती मध्ये सदर संस्थेच्या प्रतिनिधीस बोलवुन वाटाघाटी खालील प्रमाणे वाटाघाटी करण्यात आली.
वाटाघाटीनुसार संस्थेचे प्रो. प्रा. श्री. सुनिल रामदास दाते यांनी खालील प्रमाणे दर मान्य केले आहेत.

| अ. नं. | कामाचा तपशील | निविदाकाराने वाटाघाटीमध्ये मान्य केलेले | |
|---|---|---|---|
| १ | विषय-अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कचरा संकलन व वाहतुक करणेकरीता ट्रॅक्टर ट्रॉलीसह /डंपर(टिपर)मजुर भाडे तत्वावर लावणे बाबत. | प्रति ट्रॅक्टर | १५५०/- दिन |
| | | प्रति डंपर / टिपर | ३२५०/- दिन |
| | | प्रति मजूर | ३१०/- दिन |

तरी वाटाघाटी नंतर मान्य करण्यात आलेल्या दरास अंतीम मंजुरीसाठी मा.आयुक्त साहेबांचे आदेशानुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव नजीकच्या स्थायी समिती सभेमध्ये विषय घेण्यात यावा ही विनंती.

सही/-
मा. उपायुक्त (कर) साहेब,
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कचरा संकलन व वाहतुक करणे करिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह डंपर / टिपर मजूर भाडे तत्वावर लावणे कामी आलेल्या कमीचे दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बारस्कर पो.ज. :- ट्रॅक्टर ट्रॅलीसह डंपर/ टिपर मजूर भाडे तत्वावर लावणे कमी किती वेळा निविदा मागविल्या आहेत.

उपआरोग्य अधिकारी डॉ. पैठणकार :- तीन वेळा निविदा मागविल्या आहेत आलेले कमीचे दरास मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- किती कालावधीसाठी निविदा मागविल्या आहेत.

उपआरोग्य अधिकारी डॉ. पैठणकर :- एक वर्षाचे कालावधी साठी निविदा मागविल्या आहेत. गरज लागेल. त्याप्रमाणे वाहने व मजूर भाडयाने लावण्यांत येतात.

मा.सभापती साहेब :- मा.सौ. शिंदे मॅडम, यांनी सदर प्रस्तावासंदर्भात माझेकडेस पत्र दिलेले आहे. ते वाचून दाखवावे.

स्थायी समिती क्लार्क :- स्थायी समिती सदस्य मा.सौ. शिंदे मॅडम, मा.सौ. ढोणे मॅडम, व मा.सौ. ढवण मॅडम यांनी दिलेले पत्र वाचून दाखवितो. पत्राचा विषय- स्थायी समिती सभा क्र.१२ दिनांक १२/०१/११ विषय क्र.८९ कचरा संकलन व वाहतुक करणे करिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह डंपर / मजूर भाडे तत्वावर लावणे कामी निविदास मंजूरी बाबत. महोदय, कचरा संकलन व वाहतूक करणे करिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह डंपर सध्या भाडयाने घेत आहोत. सध्या ज्या ठेकेदाराला ट्रॅक्टर ट्रॉलीसह रू.११००/- दराने भाडे देत आहोत. परंतु टेंडरवर दर मात्र १५५०/- असा आलेला आहे. त्याचप्रमाणे डंपरचे दर ही ठेकेदाराने वाढविलेले आहेत. सध्या जो ठेकेदार आपणास

वरील वाहने पुरवित आहे त्यानेच टेंडर भरली आहेत. वास्तविक पाहता पालिकेमध्ये एका जाहिर नोटीशीद्वारे टेंडर विक्री अथवा टेंडर भरीत नाही अगर धाकदपटशामुळे टेंडर भरीत नाही. तरी जादा दराची दरपत्रिका मंजूर करणेस आमचा विरोध आहे. पत्रावर मा.सौ. ढोणे मालन, मा.सौ. शिंदे शिला, सौ. ढवण शारदा यांच्या सहया आहेत.

मा.सौ.ढोणे मा.सु.:- ट्रॅक्टरसाठी आपण सध्या रूपये भाडे देतो तेच रू.५००/-ने वाढवून आले आहेत.

मा.उपायुक्त (सा.) श्री. देशमुख साहेब :- तीसरे वेळेस निविदा मागविल्या आहेत आता तीन निविदा प्राप्त झाल्या त्या

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने नमुद केलेले दर "रू" प्रत ट्रॅक्टर ट्रॉली / डंपर प्रत्येकी दोन मजुर प्रति दिन | | |
|---|---|---|---|---|
| | | ट्रॅक्टर ट्रॉली | डंपर | मजुर |
| १ | स्वामी इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर, अ.नगर | १८००/ दिन | ४०००/ दिन | ४००/दिन |
| २ | स्वामी सप्लायर्स ॲण्ड अर्थ मिव्हर्स ,अ.नगर | १५९९/दिन | ३३००/ दिन | ३१०/दिन |
| ३ | मुरदारे बि एच | २२००/ दिन | ४५००/ दिन | ४१०/दिन |

या प्रमाणे आहेत.

मा.सभापती साहेब :- दर मंजूरी नंतर ते एक वर्षापर्यत चालणार आहेत. एक महिन्यासाठीच दर मंजूर करावे.

मा.उपायुक्त (कर) श्री. खरात साहेब :- मुदत संपले नंतर पुन्हा कचरा वाहतुकीसाठी वाहनांचा प्रश्न निर्माण होईल. निविदा मागविल्या तर निविदा कुणीही भरत नाहीत.

मा.सौ. ढोणे मा. सु. :- वाढवून आलेल्या दराच्या निविदा मंजूरीसाठी सभेपुढे आलेल्या आहेत. एक कोटीचा खर्च आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री. खरात साहेब :- खर्च किती होईल.

उपआरोग्य अधिकारी डॉ.श्री. पैठणकार :- एक वर्षासाठी रूपये पन्नास लाखापर्यत खर्च येईल.

मा.श्री. पवार बा.रे. :- तीन महिन्याचे कालावधीसाठी आलेले कमीचे दर मंजूर करावे. मात्र त्यांचेकडून काम करून घ्यावे. कचरा उचलला जात नाही असे होवु नये वाहन खरेदीची कार्यवाही लवकरात लवकर करण्यांत यावी.

मा.उपायुक्त (कर) श्री. खरात साहेब :- नविन ट्रॅक्टर खरेदीचा प्रस्ताव अंतीम स्तरावर आहे. आपण सहा नविन ट्रॅक्टर मागवितो आहोत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- तीन महिन्यासाठी आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- आलेले कमीचे दरास तीन महिन्याचे कालावधी साठी बहुमताने मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कचरा संकलन व वाहतुक करणे करिता ट्रॅक्टर ट्रॉलीसह डंपर/ मजूर भाडे तत्वावर लावणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक स्वामी सप्लायर्स ॲण्ड अर्थ मुव्हर्स,अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या प्रती ट्रॅक्टर रूपये १५५०/-(रूपये एक हजार पाचशे पन्नास फक्त), प्रती दिन प्रति डंपर/ टिपर रूपये३२५०/-(रूपये तीन हजार दोनशे पन्नास फक्त), प्रतीदिन व प्रति मजूर रूपये३१०/-(रूपये तीनशे दहा फक्त) प्रतीदिन याप्रमाणेचे कमीचे दरास फक्त तीन महिन्याचे कालावधीकरिता मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सदरचे ठरावास मा.स्थायी समिती सदस्य मा.सौ. ढोणे मालन सुरेश, मा.सौ. ढवण शारदा दिंगबर, मा.सौ. शिंदे शिला अनिल यांचा विरोध

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका